पुण्य नगरी

# डॉ.पां.रा.घोगरे महाविद्यालयात सायबर जनजागृती कार्यक्रम




**धुळे** : शि. वि. प्र. संस्थेचे कै. कर्म. डॉ. पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयात संगणक शास्त्र विभाग, क्विक हील फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर सेल धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर जनजागृती महिना राबविण्यात आला.

कार्यक्रमास सायबर सेलचे पोलीस कर्मचारी दिलीप वसावे, अमितेश पाटील, प्राचार्य डॉ. एम व्ही पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक, संयोजक डॉ. स्वाती बोरसे यांनी केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे यांनी संयोजन केले. या उपक्रमाबाबत संस्थेचे चेअरमन आ.कुणाल पाटील, उपाध्यक्ष डॉ. एस.टी. पाटील, प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे, कार्यालयीन अधीक्षक मुकेश पाटील यांनी कौतुक केले.

२० सायबर योद्धांनी सायबर सुरक्षा बाबत नाटीका सादर केल्या. प्रथम नाटिका ही फोटो मोर्फिंग एडिटिंगमुळे आजचे युवक कसे फसवले जातात. त्यावर काय काळजी घेतली पाहिजे यासंदर्भात हर्षल सोनार व श्रुती विसपुते यांनी माहिती दिली. यामध्ये वैभव पाटील, स्नेहल शीनकर, डिंपल चव्हाण, साक्षी पंचारिया, गणेश पाटील यांनी सादरीकरण केले. दुसरी नाटिका ही फेक वेबसाईट वरून ऑनलाइन शॉपिंग केल्यामुळे कशी फसवणूक होते. यावर दिव्या बच्छाव, लिमया पाटील, हर्षदा पाटील, गणेश पाटील यांनी सादरीकरण केले. तिसरी नाटिका ही ऑनलाइन गेम्समुळे होणारी आर्थिक फसवणूक यावर जान्हवी वाणी, जयश्री देसले, संजना देसले, साक्षी देवरे, जानवी वाघ, जयेश गोरे, श्रेया विसपुते, दिनेश सोनवणे, पूर्वा पंचारिया यांनी सादरीकरण केले.

Smart Dhule Edition
Oct 7, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com